# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांचे शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे**
- **शालेय विद्यार्थ्यांसाठी मिरा भाईंदर महानगरपालिका राबवणार "स्वच्छतेची पाठशाळा" हा नावीन्यपूर्ण उपक्रम**

दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेने "स्वच्छतेची पाठशाळा" या नावीन्यपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ केला. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत घोडबंदर शाळा क्रमांक ०९ व मिरा रोड येथील RBK शाळा येथे या उपक्रमास सुरुवात करण्यात आली. मा. आयुक्त यांनी स्वच्छतेचे महत्व व त्याच्या चार प्रकारच्या वर्गीकरणाबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच segregation100@home याबाबत विद्यार्थांना महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. सदर प्रसंगी उपायुक्त डॉ. सचिन बांगर, सहाय्यक आयुक्त योगेश गुणीजन, स्वच्छता निरीक्षक, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे व कचऱ्याचे वर्गीकरण याचे महत्त्व त्यांना पटवून देणे हा या उपक्रमा मागील प्रमुख उद्देश आहे. मा. आयुक्त यांनी स्वतः विद्यार्थ्यांना चार प्रकारच्या कचरा वर्गीकरणाबाबत माहिती दिली व त्यांच्याशी संवाद साधला. Segregation100@home म्हणजे घरापासूनच कचऱ्याचे १०० टक्के वर्गीकरण या स्वच्छतेची पाठशाळा प्रसंगी मा. आयुक्त व विद्यार्थ्यांमध्ये प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला तसेच विचारलेल्या प्रश्नांचे अचूक उत्तर दिल्यामुळे मा. आयुक्तांनी विद्यार्थ्यांचे कौतुक देखील केले. विद्यार्थ्यांपासून सुरुवात केल्याने त्यांच्या घरात, सोसायटी परिसरात, शेजारी व मित्रवर्ग यांच्यामध्ये त्यांच्या सहाय्याने स्वच्छता व कचऱ्याचे वर्गीकरण याबाबत जनजागृती करणे सोपे होईल असे मा. आयुक्त यांनी सांगितले तसेच विद्यार्थी हे या समाजाचे भविष्य आहे त्यांच्यापासूनच सुरुवात केल्याने कचरामुक्त मिरा भाईंदर शहर हे स्वप्न साकार होण्यासाठी मोलाचा हातभार लागणार असल्याच्या भावना मा. आयुक्त यांनी व्यक्त केल्या.